| | | |
|---|---|---|
| MHCH080012232022 | दाखल तारीख | १५/१२/२०२२ |
| | नोंदणी तारीख | १५/१२/२०२२ |
| | निकाल तारीख | १६/०७/२०२६ |
| | कालावधी | ०३ वर्ष ०७ महिना ०१ दिवस |

(भाग-अ)

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, न्यायालय क्र.२, ब्रम्हपुरी,**
**जि. चंद्रपूर यांच्या न्यायालयात**

(पीठासीन अधिकारी– श्रीमती एच. जे. शुक्ला)
न्यायनिर्णय घोषित दि.१६/०७/२०२६

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ७१५/२०२२** **नि. क्र.२०**
**CNR-MHCH080012232022**

(**पोलीस स्टेशन–ब्रम्हपुरी** येथील **गुन्हा नोंद क्र. २१०/२०२२**
भारतीय दंड विधानाचे कलम २९४ व ५०६(२) अन्वये)

| | | |
|---|---|---|
| **सरकार पक्ष/ फिर्यादी** | | **महाराष्ट्र शासन,**<br>मार्फत पोलीस ठाणे अधिकारी,<br>पोलीस स्टेशन, ब्रम्हपुरी, ता. ब्रम्हपुरी<br>जि. चंद्रपूर. |
| **अभियोगपक्षातर्फे** | | **सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती एस. एम. मरस्कोल्हे.** |
| **आरोपी** | | **नितिन माधवराव जेंगठे,**<br>वय–२५ वर्ष, धंदा– मजुरी,<br>रा. मेंडकी, ता. ब्रम्हपुरी, जि. चंद्रपूर. |
| **आरोपीतर्फे विधिज्ञ** | | **विधीज्ञ श्री. ए. एस. गोंडाणे.** |

## (भाग-ब)

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | | ०१/०५/२०२२ |
| फिर्याद दाखल तारीख | | ०१/०५/२०२२ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | | १५/१२/२०२२ |
| दोषारोप ठेवल्याची तारीख | | ०२/०५/२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | | ०७/०७/२०२६ |
| निकाल राखीव ठेवल्याची तारीख | | --- |
| निकालाची तारीख | | १६/०७/२०२६ |
| शिक्षा झाल्याची तारीख, शिक्षा झाली असेल तर. | | निरंक |

## <u>आरोपीचे विवरण</u>

| आरोपीचा अनु-क्रमांक | आरोपीचे नाव | अटक केल्याची तारीख | जामीन झाल्याची तारीख | कोणत्या गुन्हयाखाली दोषारोप ठेवले | शिक्षा झाली किंवा निर्दोष मुक्त | काय शिक्षा दिली | फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४२८ साठी खटला सुरु असताना आरोपीचा कारागृहातील कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | नितिन माधवराव जेंगठे. | कलम ४१(अ)(१) जाफौ प्रमाणे सुचनापत्र देऊन सोडले. | -- | भा. दं. विधानाचे कलम २९४ व ५०६(२) अन्वये. | निर्दोष मुक्त | -- | -- |

## ::न्यायनिर्णय::

( दिनांक १६ जुलै, २०२६ रोजी घोषित )

आरोपीविरुध्द भारतीय दंड विधानाचे कलम २९४ व ५०६(२) प्रमाणे अपराध केल्याबाबत दोषारोप निश्चीत केले आहे.

**अभियोगपक्षाची हकिकत थोडक्यात खालीलप्रमाणे–**

२. फिर्यादी श्रीमती वंदना प्रेमदास सयाम ही मौजा मेंडकी, ता. ब्रम्हपुरी जि. चंद्रपूर ही दिनांक ०१/०५/२०२२ रोजी गावातील महिला सौ. ललिता अशोक चौधरी हिच्या घरी वाढदिवसाच्या कार्यक्रमाला गेली असता, आरोपी हा फिर्यादीच्या घरासमोरील चौकात बसून होता. रात्री ०८.३० वाजताच्या दरम्यान फिर्यादीची मुलगी संजोगी हीने तिला फोन करुन सांगितले की, आरोपी हा वाईट शिवीगाळ करीत आहे व घराबाहेर निघ तुला मारल्याशिवाय राहत नाही अशी धमकी देत आहे. त्यानंतर फिर्यादी तिच्या घरी गेली असता, आरोपी हा तिच्या घरासमोरील चौकात हजर होता व त्याने फिर्यादीला पाहून 'ही दुसऱ्याकडे झोपायला गेली, हिचे दोन्ही मुली ह्या बाहेरच्याच आहेत, साली मादरचोद रांड हिच्यासोबत झोपतो' अशी अश्लील शिवीगाळ करुन 'दोन्ही मायलेखींचा मर्डर करतो' अशी धमकी दिली. त्यामुळे फिर्यादी यांनी आरोपीविरुद्ध पोलीस स्टेशन, ब्रम्हपुरी येथे फिर्याद दाखल केली.

३. उपरोक्त फिर्यादीवरून पोलीस स्टेशन, ब्रम्हपुरी येथे आरोपीविरूध्द भारतीय दंड विधानाचे कलम २९४ व ५०६(२) प्रमाणे गुन्हा क्र.२१०/२०२२ नोंदविण्यात आला. गुन्ह्याचा तपास श्री. हरिदास तुळशिराम सुरपाम, पो.हवा., पोस्टे, ब्रम्हपुरी यांनी केला. तपासादरम्यान घटनास्थळ पंचनामा तयार केला. साक्षीदारांचे जबाब नोंदविले. तपासाअंती आरोपीविरुध्द दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

४. आरोपीविरूध्द नि.क्र.१२ अन्वये भा.दं.वि. चे कलम २९४ व ५०६(२) प्रमाणे दोषारोप ठेवून त्याच्या भाषेत समजविण्यात आला व त्याने गुन्हा कबूल नसल्याचे सांगून संपरीक्षा पुढे चालू ठेवण्याची विनंती केली असून असे निवेदन नि.क्र.१३ वर नोंदविण्यात आले. त्यानंतर आरोपीविरुद्ध अभियोगपक्षातर्फे नोंदविण्यात आलेल्या पुराव्यात

आरोपीविरुद्ध सबळ पुरावा आढळून न आल्याने आरोपीचा फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ३१३(१)(ब) नुसार जबाब नोंदविण्यात आला नाही.

५. अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी वकील श्रीमती एस. एम. मरस्कोल्हे आणि बचावपक्षातर्फे विधिज्ञ श्री. ए. एस. गोंडाणे यांचा युक्तीवाद ऐकला. आरोपीविरुद्ध ठेवलेल्या दोषारोपावरील खालील मुद्दे माझे विचारार्थ उपस्थित झाले असून मी त्यांचा निष्कर्ष कारणमीमांसेसह पुढील प्रमाणे देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अभियोग पक्षाने सिध्द केले काय की, दिनांक ०१/०५/२०२२ रोजी सायंकाळी २०.३० ते २१.२० वाजताच्या सुमारास मौजा मेंडकी, ता. ब्रम्हपुरी येथे आरोपीने सार्वजनिक ठिकाणी फिर्यादीस “साली मादरचोद रांड हिच्यासोबत झोपतो” अशी अश्लील भाषेत शिवीगाळ केली ? | ...नकारार्थी... |
| २ | अभियोग पक्षाने सिध्द केले काय की, उपरोक्त तारीख वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादीला जिवे मारण्याची धमकी दिली ? | ...नकारार्थी... |
| ३ | काय आदेश ? | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

## ::कारणमीमांसा::

**मुद्दे क्र. १ व २ करिताः–**

६. मुद्दे क्र.१ व २ हे एकमेकांशी संलग्न असल्याने पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्याकरिता ते एकत्रीत विचारात घेण्यात आले आहेत.

७. फौजदारी न्याय संहितेनुसार आरोपीविरुद्ध गुन्हा सिध्द करण्याची जबाबदारी

अभियोग पक्षाची असून आरोपीचे निर्दोषत्व गुन्हा सिद्ध होईपर्यंत प्रमाण मानण्यात आलेले आहे. आरोपीने घेतलेला बचाव व फिर्यादीने सिद्ध केलेला पुरावा अशा दोन शक्यता निर्माण झाल्यास आरोपीच्या शक्यतेचे प्राबल्य अधिक समजून त्याला संशयाचा फायदा देता येईल.

८. सा.क्र.१ सौ. वंदना प्रेमदास सयाम (फिर्यादी) हिची साक्ष नोंदविण्यात आली. तिने तिच्या पुराव्यामध्ये घटना ४ वर्षांपूर्वी घडली असल्याचे कथन केले आहे. तिचा आरोपीसोबत किरकोळ कारणांवरुन वाद झाले होते, त्यामुळे तिने आरोपीविरुध्द रागाच्या भरात तक्रार दिल्याचे कथन केले आहे. तसेच फिर्याद व प्रथम छापील खबर अहवालावरील सही वगळता त्यातील संपूर्ण मजकुर नाकारला आहे.

९. सदरील साक्षीदार अभियोग पक्षाचे समर्थनार्थ पुरावा देत नसल्यामुळे भारतीय पुरावा कायदा, १८७२ चे कलम १५४ प्रमाणे सहायक सरकारी अभियोक्ता यांच्या विनंतीवरुन सदर साक्षीदारास उलटतपासणीत जसे प्रश्न विचारतात तसे प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली. परंतु, त्याचा अभियोग पक्षास फायदा होईल असा कुठलाही पुरावा अभिलेखावर आलेला नाही.

१०. याउलट आरोपीने तिला अश्लील शिवीगाळ केल्याचा व जिवे मारण्याची धमकी देण्याबाबतचा मजकुर स्पष्टपणे नाकारलेला आहे. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासादरम्यान तिने असे मान्य केले की, आरोपी सोबत तिचा आपसी समझोता झाला आहे व तिला आरोपीविरुध्द सदरचे प्रकरण पुढे चालवायचे नाही.

११. फिर्यादी सा.क्र.१ यांच्या साक्षीपुराव्याचे व पुरसीस नि.क्र.१५ चे अवलोकन केले असता, तिच्यामध्ये व आरोपीमध्ये आपसी तडजोड झाल्याचे दिसून येते. नि.क्र.१९ वर सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी पुरसीस दाखल करून सरकार पक्षाचा पुरावा बंद केला आहे. प्रस्तुत प्रकरणात जरी इतर साक्षीदार व तपासी अधिकारी यांना तपासले असते तरी त्यांची साक्ष ही केवळ तांत्रिक स्वरुपाची ठरली असती. त्यामुळे आरोपीविरुद्ध ठेवण्यात आलेले आरोप सिद्ध होत नसल्याने मी मुद्दे क्र.१ व २ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदविले आहे.

**मुद्दा क्र.३ करिता:–**

१२. अभिलेखावर आलेला पुरावा पाहता प्रकरणात फिर्यादी हिने तिची साक्ष तिच्या जबाबाप्रमाणे दिलेली नसल्यामुळे तिच आरोपीच्या निर्दोष मुक्तीस कारणीभूत आहे. अभियोगपक्षाने आरोपीविरुद्ध ठेवलेला दोषारोप पुराव्याअभावी सिद्ध करण्यास अयशस्वी ठरलेला आहे. करीता मी मुद्दा क्र.३ च्या उत्तरार्थ पुढील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

| :: **आदेश** :: | |
|---|---|
| १. | आरोपी **नितिन माधवराव जेंगठे** याची भारतीय दंड विधानाचे कलम २९४ व ५०६(२) या दंडनिय अपराधातून फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते. |
| २. | आरोपीचे जामीन व वैयक्तीक बंधपत्र रद्द करण्यात येत आहेत. |
| ३. | सदर प्रकरणात अपील झाल्यास आरोपीची हजेरी सुनिश्चित करण्याकरिता आरोपीस निर्देश देण्यात येते की, त्याने फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७(अ) अन्वये प्रकरणात आजपासून सहा महिन्याकरिता रु. १५,०००/– ची जमानत व तितक्यात रकमेचे वैयक्तिक बंधपत्र दाखल करावे. |
| **न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत.** | |

**स्वा/–**
**( एच. जे. शुक्ला )**

दिनांक– १६.०७.२०२६.
ठिकाण– ब्रम्हपुरी.

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय क्र.२), ब्रम्हपुरी.

## (भाग क)

## अभियोपक्षातर्फे साक्षीदार/आरोपीतर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार

**अ. अभियोगपक्षाने तपासलेले साक्षीदार**

| अ. क्र. | साक्षीदाराचे नाव | पुराव्याचे स्वरुप | नि.क्र. |
|---|---|---|---|
| १. | वंदना प्रेमदास सयाम. | फिर्यादी | १२ |

**ब. आरोपीने तपासलेले साक्षीदार – निरंक**

**क. न्यायालयीन साक्षीदार–निरंक**

**अभियोग पक्ष / बचाव पक्ष / न्यायालयीन निशाणी**

**अ. अभियोग पक्ष निशाणी**

| अनु. क्र. | निशाणी क्रमांक | विवरण |
|---|---|---|
| १ | १७/सा.क्र.१ | फिर्यादवरील सही. |
| २ | १८/सा.क्र.१ | प्रथम छापील खबर अहवालावरील सही. |

**ब. बचाव पक्ष निशाणी – निरंक**

**क. न्यायालयीन निशाणी – निरंक**

**(भाग–ड)**

**मुद्देमाल – निरंक**

स्वा/-

**(एच. जे. शुक्ला)**

दिनांक– १६.०७.२०२६
ठिकाण– ब्रम्हपुरी.

न्यायदंडाधिकरी प्रथम वर्ग,
(न्यायालय क्र.२), ब्रम्हपुरी.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original Judgment.

| | |
|---|---|
| Name of Stenographer | Ashish Sudhakar Bodale |
| Name of Court | Smt. H. J. Shukla<br>Jt.C.J. Jr. Dn. & J.M.F.C.,<br>(Court No.2)Bramhapuri. |
| Judgment Pronounced On | 16.07.2026 |
| Judgment Signed by P.O. On | 16.07.2026 |
| Judgment Uploaded On | 16.07.2026 |